महाराष्ट्र विधानसभा

विधानसभा आश्वासन समिती

(२०१८-२०१९)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

बारावा अहवाल

(सन २०१५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील आश्वासनांसंबंधीचा अहवाल)

(दिनांक ---------- रोजी विधानसभेस सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१९

महाराष्ट्र विधानसभा

आश्वासन समिती

(२०१८-२०१९)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

बारावा अहवाल

(सन २०१५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील आश्वासनांसंबंधीचा अहवाल)

विधानसभा आश्वासन समिती
(२०१८-२०१९)

समिती प्रमुख		
१.	डॉ.जयप्रकाश मुंदडा, वि.स.स तथा समिती प्रमुख	
सदस्य		
२.	श्री.हरिभाऊ जावळे, वि.स.स.	
३.	श्री. तानाजी मुटकुळे, वि.स.स.	
४.	श्री. सुरेश भोळे, वि.स.स.	
५.	श्री. विनायकराव जाधव-पाटील, वि.स.स.	
६.	श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.	
७.	श्री. प्रकाश फातर्पेकर, वि.स.स.	
८.	श्री. नागेश पाटील-आष्टीकर, वि.स.स.	
९.	श्री. चंद्रदीप नरके, वि.स.स.	
१०.	श्री. काशिराम पावरा, वि.स.स.	
११.	श्री. डी. पी. सावंत, वि.स.स	
१२.	श्री. जयकुमार गोरे, वि.स.स.	
१३.	श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.	
१४.	श्री. भास्कर जाधव, वि.स.स.	
१५.	श्री. संजय कदम, वि.स.स.	
१६.	श्री. महेश लांडगे, वि.स.स.	
१७.	श्री. रवि राणा, वि.स.स.	
१८.	श्री. गणपत गायकवाड, वि.स.स.	
१९.	श्री.क्षितीज ठाकूर, वि.स.स.	

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(१) श्री.जितेंद्र भोळे, सचिव (का.)
(२) श्री.विलास आठवले, उप सचिव,
(३) श्री.राजेश तारवी, उप सचिव,
(४) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,
(५) श्रीमती नंदिनी सावंत, कक्ष अधिकारी.

अनुकमणिका

अनुक्रमांक (१)	विषय (२)			पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना :	..	..	
१.	विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या	..	..	
२.	अभिप्राय व शिफारशी	..	..	
	परिशिष्टे :	..	..	
	परिशिष्ट-एक - आश्वासनांवर विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती	..	..	
	परिशिष्ट-दोन -आश्वासनांसंदर्भातील शासन निर्णय/परिपत्रके	..	..	
	परिशिष्ट-तीन - आश्वासनांवरील कार्यवाहीचे नमुना विवरण	..	..	
	परिशिष्ट-चार- समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त	..	..	

प्रस्तावना

मी, विधानसभा आश्वासन समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन तिच्या वतीने समितीचा **बारावा** अहवाल सभागृहास सादर करीत आहे. सन २०१५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात विधानसभेत शासनातर्फे देण्यात आलेली काही प्रलंबित आश्वासने व त्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाकडून करण्यात आलेली कार्यवाही यासंदर्भात विभागांकडून प्राप्त झालेल्या विवरणपत्रांची समितीने केलेली छाननी यासंबंधीचा समितीचा हा अहवाल आहे.

सन २०१५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाच्या कालावधीत शासनाकडून विधान सभागृहात देण्यात आलेल्या काही प्रलंबित आश्वासनांच्यासंदर्भात आश्वासन समितीचा सदरहू **बारावा** अहवाल तयार करण्यात आला आहे.

आश्वासनांबाबत विभागाने केलेली कार्यवाही परिशिष्ट "एक" मध्ये देण्यात आली असून आश्वासनांसंदर्भातील शासन निर्णय/ परिपत्रके परिशिष्ट "दोन" मध्ये देण्यात आले आहेत. तसेच आश्वासनांबाबतची माहिती सादर करण्याबाबतचे नमुना विवरणपत्र परिशिष्ट "तीन" मध्ये देण्यात आली आहे व समितीच्या बैठकांची संक्षिप्त माहिती परिशिष्ट "चार" मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

समितीने सदरहू अहवालावर दिनांक ---------- रोजी झालेल्या बैठकीत विचार करुन तो संमत केला.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २०१९.

डॉ.जयप्रकाश मुंदडा,
समिती प्रमुख,
विधानसभा आश्वासन समिती

सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या

अहवाल

सन २०१५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात शासनाने दिलेल्या आश्वासनांपैकी **प्रलंबित ११८९** आश्वासनांवर शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी खाली दर्शविलेल्या दिनांकास विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवली.

सन २०१५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनामध्ये देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीबाबत पटलावर ठेवलेल्या विवरणपत्रांचे दिनांकनिहाय क्रमांक व संख्या,

अ.क्र.	आश्वासन पटलावर ठेवल्याचा दिनांक	आश्वासन क्रमांक	आश्वासन संख्या
१)	दिनांक २१ जुलै, २०१५	१६८, ८६३, ९०५, ९७९, ९८०, १०४३, ११५०, ११५१	८
२)	दिनांक १४ डिसेंबर, २०१५	२, ४, ६, ७, ३९, ४०, ५२, ५३, ६९, ७२, ८८, ८८ अ, ८९, ९६, ९९, १०७, १०८, १११, १३५, १३६, १३८, १३९, १५३, १५४, १७०, १७४, १७५, १७६, १७९, १८६, १८७, १८९, २१०, २११, २१२, २१५, २१९, २२१, २३७, २३९, २४०, २४२, २४३, २५२, २५६, २५७, २५९, २६०, २६२, २६३, २६५, २६६, २६७, २७०, २७७, २८८, २८९, २९०, २९१, ३००, ३०२, ३०३, ३०६, ३०७, ३२४, ३३१, ३३३, ३३५, ३३६, ३३७, ३३८, ३३९, ३४०, ३४१, ३४२, ३४३, ३५०, ३५६, ३६८, ३६९, ३७०, ३७२, ३७३, ३७४, ३७५, ३७९, ३८१, ३८२, ३८९, ४५३, ४५४, ४५५, ४५६, ४५७, ४५८, ४५९, ४६०, ४६१, ४६२, ४६३, ४६४, ४६५, ४६६, ४६७, ४६९, ४७०, ४७२, ४७६, ४८९, ४९०, ४९१, ४९३, ४९५, ४९६, ४९७, ५०२, ५०४, ५११, ५१२, ५१३, ५१७, ५१९, ५२१, ५२२, ५२३, ५३९, ५४७, ५४९, ५५०, ५५३, ५५६, ५६२, ५६६, ५७३, ५८७, ५८८, ५९३, ५९५, ६०१, ६०३, ६०४, ६०६, ६०७, ६०८, ६०९, ६११, ६१२, ६१३, ६१५, ६२६, ६३१, ६३२, ६३४, ६३५, ६३६, ६३७, ६३९, ६४०, ६४१, ६४४, ६४९, ६५२, ६५४, ६५६, ६६०, ६६४, ६६५, ६६८, ६६९, ६७०, ६७१, ६७७, ६८०, ६८१, ६८३, ६८७, ६८८, ६८९, ६९५, ७०९, ७२१, ७२३, ७२४, ७२६, ७२७, ७२८, ७३०, ७४९, ७५८, ७५९, ७६०, ७८२, ७८५, ७८७, ७९४, ७९७, ७९८, ८०१, ८०९, ८१४, ८१५, ८१८, ८२१, ८२२, ८२३, ८२४, ८२५, ८२६, ८२७, ८२८, ८३२, ८३३, ८३४, ८३५, ८३६, ८३७, ८३८, ८३९, ८४०, ८४९, ८५०, ८५१, ८५५, ८५६, ८५९, ८७३, ८७४, ८८३, ९०४, ९६५, ९६९, ९७१, ९७२, ९७४, ९७६, ९७८, ९९३, ९९४, ९९७, ९९९, १००१, १००२, १००३, १००४, १००६, १०२५, १०२७, १०३०, १०३२, १०३३, १०३४, १०३५, १०३६, १०३७, १०३८, १०३९, १०४०, १०४१, १०४२, १०७०, १०७१, १०७५, १०७७, १०८१, १०८२, १०८७, १०९०, १०९१, ११०१, ११०२, ११०६, ११०९, १११३, १११४, १११५, १११६, १११७, १११८, ११२०, ११२१, ११३४, ११३५, ११५४, ११६३, ११६५, ११७४, ११७७, ११७८, ११८०, ११८१, ११८२, ११८३,	२९२

३)	दिनांक २८ मार्च, २०१६	३, ५, ८, ९, ११, २०, २७, २९, ३८, ४८, ५०, ५४, ५५, ५६, ७८, ८०, ९२, १०५, १२६, १३४, १३७, १४१, १५७, १५८, १६६, २१८, २२८, २३२, २३४, २३५, २४७, २४८, २४९, २७१, २८०, २८५, ३०१, ३३४, ३६२, ३६३, ३६७, ३८६, ३८७, ४०८, ४०९, ४१८, ४२६, ४२७, ४२८, ४३३, ४३५, ४३९, ४७१, ४७८, ४८०, ४८१, ४८२, ४९२, ४९४, ४९८, ४९९, ५३१, ५३६, ५४०, ५५७, ५६०, ५७८, ५९२, ५९४, ५९८, ६०५, ६२३, ६२४, ६२५, ६३३, ६४३, ६४६, ६५०, ६५७, ६६२, ६६३, ६६६, ६६७, ६७३, ६७४, ६७५, ६८६, ६९६, ७०१, ७१६, ७७८, ७८०, ७८१, ७९६, ८४२, ८४३, ८४८, ८५२, ८५३, ८५७, ८५८, ८६०, ८६२, ८९३, ९०१, ९०३, ९१४, ९१७, ९१८, ९१९, ९२०, ९२१, ९२३, ९२४, ९६१, ९६२, ९६३, ९८७, ९८८, ९९१, १००९, १०१०, १०११, १०२०, १०२१, १०२२, १०२४, १०२८, १०३१, १०५२, १०५३, १०८३, १०८४, १०८५, १०८६, १०९२, ११२९, ११३०, ११३१, ११६९, ११७०, ११८८	१४२
४)	दिनांक २६ जुलै, २०१६	२१, ४१, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४९, ५१, ६२, ६३, ६६, ८२, ९१, ९३, ११६, १२३, १२४, १४०, १४४, १५९, १६१, १६४, १६७, १८४, १८५, १९१, २०७, २२२, २२३, २२५, २२६, २२७, २४४, २४५, २६८, २६९, २८४, २८७, २९७, २९८, २९९, ३१५, ३१६, ३१७, ३१८, ३१९, ३२०, ३२१, ३२३, ३५२, ३६६, ३८५, ३९१, ३९३, ३९४, ३९५, ४३६, ४३७, ४३८, ५०३, ५०५, ५०६, ५०७, ५०८, ५०९, ५१०, ५४२, ५४५, ५६१, ५६९, ५७१, ५७५, ५७६, ५७७, ५८३, ५८४, ५८५, ५९९, ६१८, ६१९, ६२९, ६३०, ६६१, ६७२, ६८५, ६९१, ६९३, ७१५, ७३३, ७६१, ७७९, ८०३, ८१६, ८१७, ८२०, ८४७, ८५४, ८६४, ८६५, ८६६, ८६७, ८६८, ८६९, ८७०, ८७१, ८७२, ८८४, ८८५, ८८६, ८८७, ८८८, ८९०, ८९२, ८९४, ८९५, ९५४, ९५५, ९५६, ९५७, ९५८, ९५९, ९६०, ९७५, ९७७, ९९२, ९९५, ९९६, १०४४, १०४५, १०४६, १०८८, १०९३, १०९४, ११०३, १११९, ११५३, ११६१, ११६७, ११६८, ११७१	१४१
५)	दिनांक ७ डिसेंबर, २०१६	१३, १४, १५, १६, ८१, ८६, १६२, २०५, २४१, २७६, ३२७, ४४१, ४४५, ४४६, ४४७, ४५१, ५५४, ६२१, ६९०, ७०५, ७०६, ७०७, ७०८, ७११, ७३१, ८९१, ९११, ९१२, ९१५, ९१६, ९२७, १०२६, ११५२, ११५५, ११५६, ११५७, ११५८, ११८४	३८
६)	१० मार्च, २०१७	१०१, १०९, ५६७, ९२८, ११३२	५
७)	२८ जुलै, २०१७	१०, २६, १६०, २५८, ६१७, ६२०, ६२२, ७५५, ७९९, ८७७, ८७८, ८७९, ८८१, १०६१, ११२८	१५
८)	१४ डिसेंबर, २०१७	१०४, १०६, ११०, १९६, २१३, ३१३, ३१४, ३९२, ५८९, ५९०, ६२८, ६७८, ७१७, ७१९	१४
११)	२७ नोव्हेंबर, २०१८	७१०	१
		• **<u>विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी एकूण प्रलंबित आश्वासने -</u>** २८, ३०, ३१, ३२, ७०, १०३, १४३, १५५, १८०, १९७, १९८, १९९, २००, २४६, २५३, २५४, २५५, २६४, ३९६, ३९७, ४०२, ४०३, ४०४, ४०५, ४०६, ४०७, ४१०, ४११, ४१२, ४१३, ४१४, ४६८, ४८३, ४८४, ४५, ४८६, ४८७, ४८८, ५३२, ५३३, ५३७, ५६४, ५६५, ५९६, ६१६, ६५९, ६७६, ६७९, ६९८, ६९९, ७००, ७३६, ७३७, ७३९, ७४०, ७४१, ७४२, ७४३,	९४

		७४४, ७४५, ७४७, ७४८, ८१२, ८३१, ८८२, ८९६, ८९७, ९५२, ९५३, ९८२, १०१३, १०१४, १०१६, १०१७, १०१८, १०१९, १०५४, १०५५, १०५६, १०५७, १०५८, १०५९, १०६०, १०६२, १०६३, १०६४, १०७२, ११०७, ११०८, १११०, ११२७, ११६४, ११७५, ११७६ **पटलावर ठेवलेली परंतु समितीच्या विचार विनिमयासाठी (वाचनासाठी) प्रलंबित असलेली आश्वासने** १, १७, १८, १९, ४२, ५९, ६४, ७९, ९०, ९८, १०२, १५१, १५२, १६३, १६५, १७८, १९२, १९३, १९४, १९५, २०१, २०२, २०६, २१४, २७४, २७५, २८६, ३०८, ३१०, ३११, ३२८, ३३०, ३३२, ३४४, ३४५, ४२२, ४२४, ४२५, ४४०, ४७३, ५०१, ५४३, ५४४, ५४८, ५५९, ५६३, ५७०, ५७९, ५८०, ५८१, ६००, ६०२, ६८२, ६९७, ७२०, ७२५, ७५२, ७५६, ७५७, ७६२, ७६३, ७६४, ७६५, ७६६, ७७४, ७८३, ७८४, ७८९, ८००, ८०२, ८०५, ८०६, ८०८, ८१०, ८११, ८१३, ८४४, ८६१, ८७५, ८९८, ८९९, ९००, ९०७, ९०८, ९२९, ९३१, ९३३, ९३७, ९४२, ९४४, ९४८, ९६४, ९६६, ९६७, ९६८, ९७०, ९८१, ९८९, ९९०, १०१५, १०२९, १०४९, १०७३, १०७४, १०७६, १०८०, १०९५, १०९६, १०९७, १०९८, १०९९, ११००, १११२, ११३६, ११३७, ११३९, ११४०, ११४२, ११६२, ११६६, ११८६ ● -----विभागाचे वगळावयाचे प्रकरण क्रमाक-, २०३, २०४, ४४२, ८०४, ९१०, १००८, १०१२	१२१ ७
		एकूण	**८७८**

विवरणपत्रे सादर होण्यास झालेला विलंब.

सन २०१५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाच्या कालावधीत शासनाकडून देण्यात आलेल्या एकूण ११८९ आश्वासनांपैकी मा.संसदीय कार्य मंत्री यांनी सभागृहाच्या पटलावर ठेवलेल्या कार्यवाहीच्या विवरणपत्राची दिनांक निहाय संख्या विचारात घेता असे दिसून येते की, साधारणत: ८ आश्वासनांवरील विवरणपत्रे विहित कालावधीमध्ये सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली. २९२ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी ४ महिने १३ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, १४२ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी ७ महिने २१ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, १४१ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी ११ महिने २५ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, ३८ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी १ वर्ष ४ महिने ६ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, ५ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी १ वर्ष ७ महिने ९ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, १५ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी १ वर्ष ११ महिने २७ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे १४ आश्वासनांवरील विवरणपत्रे पटलावर ठेवण्यासाठी २ वर्ष ४ महिने १३ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, १ आश्वासनावरील विवरणपत्र पटलावर ठेवण्यासाठी ३ वर्ष ३ महिने २६ दिवस एवढा कालावधी लागलेला आहे, अद्याप ३११ आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे प्रलंबित आहेत. या प्रलंबित आश्वासनांची सविस्तर माहिती देणारे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.

प्रलंबित आश्वासनांची विभागनिहाय यादी

अ.क्र. (१)	विभागाचे नांव (२)	आश्वासन क्रमांक (३).	आश्वासनांची एकूण संख्या. (४)
१.	महसूल व वन विभाग	६०, ६१, ११२, ११३, ११४, ११५, ११७, ११८, ११९, १२०, १२१, १२२, १२९, १३०, १३१, १३२, १५६, १७२, १७३, २९६, ३२९, ५८६, ७०२, ७०३, ७०४, ७१२, ७१३, ७१४, ७५०, ७५१, ७५३, ८८०, ९०६, ९३०, ९३२, ९३४, ९३५, ९३६, ९३८, ९३९, ९४०, ९४१, १००५, १००७, १११९, **वगळावयाचे प्रकरण ११२२,** ११२३, ११३८, ११४१	४९
२.	उद्योग ऊर्जा व कामगार विभाग.	३५१, ३५३, ३५४, ३५५, ३५७, ३५८, ३५९, ३६०, ३६१, ३६४, ३६५, ३७१, ३७६, ३७७, ३७८, ३८०, ३८३, ३८४, ३८८, ३९०, ६२७, ६३८, ६४२, ६४५, ६४७, ६४८, ६५१, ६५३, ६५५, ६५८, ८४१, ९९८, १०००, ११३३, ११४३, ११४४, ११४५, ११४६, ११४७, ११४८, ११४९	४१
३.	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	९७, ४२१, ५१४, ५१५, ५१६, ५१८, ५२०, ५२९, ५३०, ५३८, ५६८, ७६७, ७६८, ७६९, ७७०, ७७१, ७७२, ७७३, ८२९, ८३०, ९४९, ९५०, ९५१, १०२३	२४
४.	शालेय शिक्षण व क्रिडा विभाग.	१३३, २७२, ३९८, ३९९, ४००, ४०१, ४१५, ४१६, ४१७, ९०२, ९२५, ११७९, ११८५, ११८७	१४
५.	उच्च व तंत्रशिक्षण विभाग	१४८, ८८९	२

६.	नगरविकास विभाग	२५, ९४, ९५, १२५, १२७, १२८, १७७, ३०४, ३०५, ३०९, ३२२, ४७९, ५७२, ५७४, ९४३, ९४५, ९४६, ९४७, १०५०, १०५१	२०
७.	गृह विभाग	२२, २३, २४, ६५, ६७, ६८, १८१, १८२, १८३, १८८, १९०, २०८, २०९, २१६, २१७, २२०, २२४, २२९, २३०, २३१, २३३, ३२५, ४१९, ४२०, ४४३, ४४४, ४४८, ४४९, ४५०, ४७४, ४७५, ४७७, ५३४, ५८२, ९२२, ९२६, ९७३	३७
८.	सार्वजनिक बांधकाम विभाग	२३६, २३८, ५३५	३
११	कृषी व पदुम विभाग	५७, ५८, ५४६, ५९१, ६९४, ७५४, ९०९, ९१३	८
१२.	ग्रामविकास व जलसंधारण विभाग	२८१, २८२, २८३, २९२, २९३, २९४, २९५, ३२६, ७८६, ७८८, ७९०, ७९१, ७९२, ७९३, ७९५, ८०७, ८४५, ८४६, ११७२	१९
१५.	वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग	१४६, १४७, १४९, १५०, ४२३, ५२४, ५२५, ५५५, ७३२, ७३४, ७३५, ७३८, ८७६, ११५९, ११६०	१५
१६.	सार्वजनिक आरोग्य विभाग	८३, ८४, ८५, ८७, २७९, ३४६, ३४७, ३४८, ३४९, ४२९, ४३०, ४३१, ४३२, ४३४, ६९२, ११२४, ११२५, ११२६	१८
१७.	सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग	४५२, ५२६, ५२७, ५२८, ५४१, ७२९, १०६५, १०६६, १०६७, १०६८, १०६९, १०८९	१२
१८.	नियोजन विभाग	७१, २७८	२
१९.	पर्यावरण विभाग	३१२, ७१८, ७४६	३
२०.	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग	१४२, १४५, १०४७, १०४८, ११०४, ११०५	६
२१.	जलसंपदा विभाग	६१०, ६१४, ६८४, ७२२	४
२३.	गृहनिर्माण विभाग	१२, १००, १७१, ७७५, ७७६, ७७७, ८१९	७
२४.	आदिवासी विकास विभाग	३३, ३४, ३५, ३६, ३७, २५०, २५१, ५००, १०७८, १०७९, ११७३	११
२५.	महिला व बालविकास विभाग	७३, ७४, ७५, ७६, ७७, ५९७	६
२६.	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग	१६९	१
२७.	विधी व न्याय विभाग	२६१	१
२८.	अल्पसंख्यांक विभाग	२७३	१
२९.	सांस्कृतिक कार्य व पर्यटन विभाग विभाग	५५१, ५५२, ५५८, ९८५, ९८६	५
३०.	मराठी भाषा विभाग	९८३, ९८४	२
		एकूण	**३११**

उपरोक्त आश्वासनांबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही/अंतरिम माहिती देखील, संबधित विभागांनी समितीला पुरविलेली नाही. याबाबत समिती नापसंती व्यक्त करीत आहे. याबाबत विभागाने वेळीच कार्यवाही केली असती तर ही आश्वासने प्रलंबित राहिली नसती असे समितीला वाटते. आता तरी विभागाने या प्रकरणी गंभीर दखल घेऊन प्रलंबित असलेल्या आश्वासनांबाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर लवकरात

लवकर ठेवण्याची व्यवस्था करावी. या आश्वासनांबाबत शासनातर्फे करण्यात आलेल्या **" कार्यवाहीचे विवरण"** जरी सादर करण्यात आलेले नसले तरी या आश्वासनांच्या क्रमांकानुसार करण्यात आलेल्या नोंदी सभागृहाच्या माहितीसाठी अहवालामध्ये अंर्तभूत करण्याचे समितीने ठरविले आहे. **"कार्यवाहीचे विवरणपत्र तात्काळ सादर करण्यात यावे"** असे त्या ठिकाणी नमूद करण्यात आले आहे. एक महिन्याच्या आत असे विवरणपत्र सादर करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

अभिप्राय - शिफारशी

विधानसभा सभागृहात मा.सदस्यांद्वारे विविध संसदीय आयुधांद्वारे उपस्थित करण्यात आलेल्या बाबींवरील चर्चेला उत्तर देत असताना मा.मंत्री महोदयांकडून आश्वासने, अभिवचने दिली जातात. सभागृहात दिलेल्या सदर आश्वासनांची पूर्तता शासनाने ९० दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे. तथापि, बहुतेक प्रकरणात आश्वासनाच्या पूर्ततेसाठी सदर विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागत असल्याची बाब समितीने आपल्या यापूर्वी सादर केलेल्या विविध अहवालांद्वारे वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेल्या असूनही त्यामध्ये शासनाकडून आश्वासनांची पूर्तता करण्यामध्ये फारशी सुधारणा झाल्याचे समितीला आढळून येत नाही. प्रलंबित आश्वासने विचारात घेता ज्या आश्वासनामध्ये शासन स्तरावर कार्यवाही करणे, त्याची पूर्तता करणे सहज शक्य आहे अशी आश्वासने देखील शासनाच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उदासीनतेच्या धोरणामुळे विधानमंडळास सादर करण्यात कमालीचा विलंब होत आहे. ज्या आश्वासनांसंदर्भात विषय न्यायालयाच्या अधिकार कक्षेत आहेत अशा आश्वासनांसंदर्भात विलंब होत असल्यास ती बाब समजण्यासारखी आहे. तथापि, जी आश्वासने शासनाच्या स्तरावर वेळीच निपटारा करणे शक्य असतात अशी आश्वासने वेळेत पाठविण्यामध्ये जी दिरंगाई शासनाकडून दाखविली जाते ती अक्षम्य आहे असे समितीचे मत आहे. यासाठी समितीला संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक वाटते, कारण विलंबाने येणाऱ्या आश्वासनांमुळे सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध संसदीय आयुधांवर मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या अभिवचन अथवा आश्वासनांची वेळीच पूर्तता झाली नसेल तर सभागृहात जे सन्माननीय सदस्य राज्यातील सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाचे असलेले विषय उपस्थित करतात, ज्या बाबींसंदर्भात शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीबाबत उहापोह केला जातो त्यात सुधारणा अथवा आणखी काही बदल करण्याची मागणी विविध संसदीय आयुधांमार्फत सभागृहात केली जाते व अशी मागणी मा.मंत्री महोदयांच्या माध्यमातून आश्वासनांच्या रुपाने सभागृहात पूर्तता झाल्यानंतरच सदरच्या आश्वासनांवर विश्वास ठेवून संबंधित संसदीय आयुध तेवढयापुरते सभागृहात थांबविले जाते. याचा अर्थ असा आहे की, जे आश्वासन सभागृहात दिले जाते त्यावर शासनाने सर्वंकष कार्यवाही करुन त्याचा पूर्तता अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवणे अपेक्षित आहे. तद्वतच विधानसभेच्या या समितीकडे सदरच्या आश्वासनपूर्ततेचा परिपूर्ण अहवाल पाठविणे आवश्यक आहे. **तथापि अधिकाऱ्यांद्वारा या बाबींसंदर्भात अक्षम्य विलंब केला जात असल्यामुळे याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित करुन त्यासंदर्भात शासनाने कडक धोरण आखून सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता ही कोणत्याही परिस्थितीमध्ये ९० दिवसांच्या आत होणे आवश्यक आहे. ज्या प्रकरणात न्यायालयीन अडथळे आहेत अथवा पूर्ततेबाबत काही अडचणी आहेत अशा बाबीदेखील शासनाने समितीच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. म्हणून यासाठी शासनाने एक सर्वंकष निर्णय घेऊन या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत संबंधित विभागाचे उप सचिव तथा सह सचिव यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन आश्वासन पूर्ततेसंदर्भात जाणीवपूर्वक दिरंगाई झाल्यास अशा अधिकाऱ्यांविरुध्द ठोस कारवाई करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात यावा. तसेच दर तीन महिन्याला संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांनी म्हणजेच सचिव / प्रधान सचिव यांनी त्यांच्या विभागाच्या संबंधित उप सचिव /**

सह सचिव यांचेसमवेत आश्वासनांच्या पूर्ततेबाबतच्या आढावा बैठका घेऊन मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासने / अभिवचने संदर्भात जी आश्वासने / अभिवचने सहज पूर्ण करणे शक्य आहे, अशा बाबतीत त्वरेने निर्णय घेऊन त्याबाबतचे विवरणपत्र संसदीय कार्य विभागामार्फत सभागृहाला पाठविण्याची कार्यवाही तत्परतेने व त्वरेने करावी तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

सन २०१५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात शासनाने दिलेल्या आश्वासनांपैकी प्रलंबित असलेल्या ११८९ आश्वासनांवर शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवली. याच ११८९ आश्वासनांपैकी समितीने ६५६ आश्वासनांचे वाचन करुन त्यावर निर्णय घेतला. १२१ आश्वासने समितीच्या विचारविनिमयासाठी (वाचनासाठी) प्रलंबित आहे. ९४ आश्वासने साक्षीसाठी प्रलंबित आहेत. आणि सुमारे ३११ आश्वासने विभागाकडे प्रलंबित आहेत. शासनाने केलेल्या या कार्यवाहीबद्दल समिती समाधान व्यक्त करते.

मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनावर केलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर विलंबाने ठेवणे ही एक मोठी समस्या आहे. यात संसदीय कार्य विभागाने संबंधित विभागाशी संपर्क ठेऊन कोणत्याही परिस्थितीत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणारी विवरणपत्रे विहित मुदतीत सभागृहासमोर ठेवणे आवश्यक आहे. सदरची विवरणपत्रे विलंबाने पटलावर ठेवल्यामुळे संबंधित आश्वासने उक्त संसदीय आयुधातील विषय कालबाह्य झाल्याने विचारात घेणे समितीला शक्य होत नाही. परिणामी समितीच्या कामकाजात व्यत्यय निर्माण होतो. याबाबीसंदर्भात देखील शासनाने कठोर निर्णय घेणे आवश्यक आहे.

संसदीय लोकशाही प्रक्रियेमध्ये सभागृहात देण्यात येणाऱ्या आश्वासनांना अनन्य साधारण महत्व आहे. मा.सदस्यांना सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या विषयावर चर्चा उपस्थित करुन संबंधित मंत्री महोदयांना त्यावर लगेच कार्यवाही करणे शक्य होत नसल्याने काही विषयाच्या बाबतीत आश्वासने दिली जातात. अशा आश्वासनांची पूर्तता सुदृढ संसदीय लोकशाहीसाठी अत्यंत आवश्यक आहे. कारण या आश्वासनांचा विविध योजनांच्या माध्यमातून जनतेवर प्रभाव पडत असतो आणि सदरच्या आश्वासनांची वेळीच पूर्तता झाल्यास जनतेमध्ये त्याचा सकारात्मक प्रतिसाद दिसून येतो. तथापि, वर्षानुवर्षे आश्वासनांची पूर्तता न झाल्यास जनतेचा शासन व्यवस्थेवरील विश्वास उडून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारतीय संविधानात विधानमंडळाच्या दोन अधिवेशनामधील कालावधी हा सहा महिन्यांपेक्षा जास्त असू नये अशी तरतूद आहे. या तरतूदीस अनुसरुन आपल्या राज्यातील राज्य विधानमंडळाची वर्षातून कमीत कमी तीन अधिवेशने होत असतात. ज्याला आपण उन्हाळी (अर्थसंकल्पीय), पावसाळी आणि हिवाळी अधिवेशने असे संबोधतो. म्हणूनच सभागृहात देण्यात येणाऱ्या प्रत्येक आश्वासनांच्या पूर्ततेचा कालावधी हा ९० दिवसांचा ठेवण्यात आला आहे. या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांची / अभिवचनाची पूर्तता ज्या अधिवेशनात दिली त्याच्या पुढच्या अधिवेशनात त्याची पूर्तता व्हावी हा उद्देश आहे. शासनाच्या विविध योजना राबविताना अशा आश्वासनाची पूर्तता करताना शासनाच्या संबंधित विभागास पुरेसा वेळ मिळावा ही या मागील भूमिका आहे. अशा परिस्थितीमध्ये शासनाच्या सर्व संबंधित

अधिकाऱ्यांचे कर्तव्य असते की, **सभागृहात मंत्री महोदयाने आश्वासन दिल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत आश्वासीत केलेली आश्वासने प्रस्तावित करुन त्यावर निर्णय घेऊन त्यानंतर येणाऱ्या लगतच्या अधिवेशनात आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी. विधानसभेच्या नियमानुसार आश्वासनांच्या पुर्ततेबाबत शासनास ९० दिवस इतक्या कालावधीची मर्यादा घालून दिली आहे. सदर मर्यादेचे उल्लंघन कोणत्याही परिस्थितीत होता कामा नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केल्यास बहुतांश आश्वासनांची पूर्तता ही वेळेत किंबहूना वेळेच्या आधीदेखील होऊ शकते असे समितीचे ठाम मत आहे. सबब, आश्वासनांचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर विविध कालावधीत ठेवण्यासाठी शासनाने कडक धोरण आखावे. आश्वासनाची पूर्तता जाणीवपूर्वक व हेतुपुरस्सरपणे विलंबाने करणाऱ्या संबंधित विभागाच्या उप सचिव/ सह सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन उक्त अधिकाऱ्यानी त्यांच्या कार्यकाळात त्यासंदर्भात नस्ती प्रस्तावीत करुन आश्वासन पूर्ततेचा पाठपुरावा करुन व तसे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासंदर्भात जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाने सर्वकष निर्णय घेऊन यासंदर्भात तातडीने परिपत्रक निर्गमित करावे व त्याबाबतचा अहवाल समितीला १ महिन्याच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

सन १९९१ ते सन २०१८ या कालावधीतील एकूण आश्वासनांची संख्या ४७,४६५ एवढी आहे. त्यापैकी आतापर्यंत शासनाने ४३९२४ एवढी आश्वासने निकाली काढली आहेत आणि प्रलंबित आश्वासनांची संख्या ३५४१ इतकी आहे.

वरीलप्रमाणे प्रलंबित आश्वासनांची संख्या विचारात घेता फार मोठ्या प्रमाणावर आहे. सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणाऱ्या आश्वासनांची संसदीय कार्य विभागाकडून विविध विभागाद्वारे पाठविलेली आश्वासने एकत्रित करुन त्या सभागृहाच्या पटलावर ठेवली जातात. अशा आश्वासनांची संख्या मोठया प्रमाणात असते. त्यातील वेगवेगळ्या विभागाकडून संसदीय कार्य विभागाकडे पाठविण्यात आलेली आश्वासने याचे एकत्रित संकलन करुन त्याचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवले जाते. अशा संकलित केलेल्या आश्वासनांच्या विवरणाच्या प्रती अहवालाच्या माध्यमातून विधानमंडळाला सादर कराव्या लागतात. म्हणून विभागाने आश्वासनांची पूर्तता संसदीय कार्य विभागाकडे करताना विवरणपत्रे "सॉफ्ट कॉपी" मध्ये घेऊन संसदीय कार्य विभागाकडे सादर करावी व संसदीय कार्य विभागाने अशा एकत्रित जमा झालेल्या सर्व आश्वासनांची पूर्तता एकत्रित "सॉफ्ट कॉपी" मध्ये घेऊन ती विधानमंडळाकडे सादर करावी व अशा एकत्रित केलेल्या विवरणपत्राची माहिती **शासनामार्फत वेळोवळी पटलावर ठेवण्यात येणाऱ्या वर्षनिहाय व प्रत्येक अधिवेशननिहाय आश्वासनांबाबतच्या पूर्ततेबाबतची कार्यवाही विवरणपत्रासह सादर करावी. आश्वासनांच्या पूर्ततेबाबत मंत्रालयीन विभागाकडून समितीपुढे ठेवण्यासाठी पाठविण्यात येणाऱ्या विवरणपत्रात आश्वासनांचे विषय, मंत्री/ राज्यमंत्री महोदयांकडून सभागृहात देण्यात आलेले आश्वासने व करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा विभागाने केलेला उल्लेख यामध्ये बऱ्याच वेळेला विसंगती व तफावत आढळून येत असते. आश्वासनांचा विषय व त्याच्या पूर्ततेबाबतदेखील तफावत दिसून येत असते. याचाच अर्थ संबंधित अधिकारी हे वेळ मारुन नेण्यासाठी समितीपुढे हलगर्जीपणाने आश्वासनांची पूर्तता करीत असतात. आश्वासनांची पूर्तता ही विषयाच्या अनुषंगाने सुसंगत व परिपूर्ण असणे आवश्यक**

आहे. समितीच्या बैठकीत पहिल्या वाचनाच्या वेळी आढळून येणाऱ्या त्रुटींबाबत समिती गांभीर्याने घेत असून यापूढील काळात समितीसमोर ठेवण्यात येणाऱ्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबतची विवरणपत्रे ही कोणत्याही परिस्थितीत मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांशी सुसंगत व आश्वासनांच्या कक्षेत असल्याबाबत खात्री करुनच समितीकडे परिसृत करावीत व यासंदर्भात शासनाने सर्वकष परिपत्रक त्वरेने निर्गमित करुन यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

आश्वासन क्र. ५८८

विधानसभेचे सन २०१५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील आश्वासन **क्र. ५८८** बाबत दिनांक २५ मार्च, २०१५ रोजी **"सन २०१५-१६ या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला माननीय वित्त मंत्री यांचे उत्तर"** या विषयावर मा. मंत्री महोदयांनी **"प्रत्येक जिल्ह्यामध्ये शासकीय कृषि महाविद्यालय स्थापन करण्यासाठी मंजुरी द्यावयाची आहे. राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये जागा उपलब्ध होईल, तेथे प्राधान्याने कृषि महाविद्यालय शासनाच्या माध्यमातून सुरु केले जाईल. एका ठिकाणी फलोत्पादन महाविद्यालय असेल, एका ठिकाणी पशुसंवर्धनाच्या संदर्भात महाविद्यालय असेल. निरनिराळे फॅकल्टी तयार करण्यात येतील."** असे आश्वासन दिले होते.

उपरोक्त आश्वासनाच्या अनुषंगाने मंगळवार दिनांक १० ऑक्टोबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी जळगांव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथे कृषी महाविद्यालय स्थापन करण्यात आले असून मंत्रीमंडळाच्या बैठकीत सांगली व यवतमाळ येथे कृषी महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी दिली आहे. तसेच बुलढाणा आणि पालघर येथे कृषी महाविद्यालय उभारण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे असे समितीस विदित केले.

यावेळी समितीने सन २०१६ च्या अर्थसंकल्पामध्ये मा.मंत्री महोदयांनी पाल, ता.रावेर, जि.जळगांव येथे फलोत्पादन महाविद्यालय स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार पाल येथे फलोत्पादन महाविद्यालय स्थापन करण्यासाठी ४० एकर जमिनीची आवश्यकता असून सध्या २० हेक्टर जमीन आयडेन्टीफाय केलेली आहे. पाल येथे फलोत्पादन महाविद्यालय उभारण्यासाठी २० हेक्टर जमिन उपलब्ध आहे. परंतु त्यासाठी ४० हेक्टर जागेची आवश्यकता आहे. परंतु तेथील जमिन वरकस व डोंगराळ असल्यामुळे तत्कालीन मंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत कुलगुरुंनी सदर जागा योग्य नसल्याचे सांगितले. यावेळी मा.मंत्री श्री.एकनाथ खडसे यांनी दुसरी जागा देण्यात येईल असे सांगितले. आयसीआरच्या नॉर्मनुसार स्टपिंग पॅटर्नसंबंधी कृषि परिषदेची आणि विद्यापीठ कार्यकारी परिषदेच्या मान्यतेने असल्यामुळे प्रस्ताव आल्यानंतर तो मंत्रीमंडळापुढे ठेवण्यात येईल. तसेच फलोत्पादन महाविद्यालयाची आवश्यकता असल्यामुळे खिरोंदा येथे सोलर युनिट उभे रहाणार होते परंतु तो प्रकल्प रद्द करून ती जमीन फलोत्पादन महाविद्यालय सुरु करण्यसाठी देत आहेत तेथे शैक्षणिक संकुल उभे राहिल. फलोत्पादन महाविद्यालयासाठी पर्यायी जमीन उपलब्ध आहे.

शासनाने सन २०१५ मध्ये राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात कृषी महाविद्यालय, फलोत्पादन महाविद्यालय व पशुसंवर्धन महाविद्यालय स्थापन करण्यात येईल अशा प्रकारचा निर्णय घेतला होता त्यानुसार राज्यातील किती जिल्ह्यात सदर महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत तसेच किती जिल्ह्यांत प्रस्तावित आहेत. तसेच पाल, ता.रावेर

जि.जळगाव येथे जागा उपलब्ध करून त्वरीत फलोत्पादन महाविद्यालय कार्यान्वित करणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

आश्वासन क्र. ५९४

विधानसभेच्या सन २०१५ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्र. ५९४ या बाबत **सन २०१५ -२०१६ च्या अर्थसंकल्पातील सर्वसाधारण चर्चा या विषयावरील झालेल्या चर्चेत मा.मंत्री महोदयांनी "या पुढे अंगणवाड्यामध्ये जे खाद्य दिले जाते त्यात ही दुधाची पावडर देता येईल का, याची तपासणी वैद्यकिय क्षेत्रातील नामवंताकडून करून ही दुधाची पावडर देण्याची प्रक्रिया सुरु करण्याच्या विचारात आहेत असे आश्वासन दिले होते".**

त्यानुसार बुधवार, दिनांक ६ जून, २०१८ रोजी आश्वासन क्र. ५९४ बाबत वाचन करण्यात आले असता त्यावेळी विभागाने सदरहू आश्वासन पुर्तीबाबत शालेय पोषण आहारामध्ये दुध भुकटीचा समावेश करण्याबाबत आदिवासी विकास, महिला व बालविकास, शालेय शिक्षण विभाग व समाजकल्याण विभाग यांना आयुक्त दुग्धव्यवसाय विभाग कार्यालयाकडून विचारणा करण्यात आलेली असून त्यांची सहमती अद्याप अप्राप्त आहे अशी समितीस माहिती होती तसेच उपरोक्त आश्वासनासंदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत दुधाची भुकटी तयार करण्याची योजना राबविण्यासाठी एकूण किती खर्च येईल तसेच सन २०१५ मध्ये ५ हजार ६२५ मे.टन भुकटी होती. त्यातील २६२४ मे.टन भुकटी शालेय पोषण आहारासाठी देण्याचा निर्णय घेतला होता.. या बाबत मंत्री महोदयांच्या समवेत घेण्यात आलेल्या बैठकीत मा. मुख्यमंत्री महोदयांकडे बैठक घेण्यात यावी व अंतिम निर्णय घेण्यात यावा. दुधाची भुकटी ऑक्टोबर, २०१६ मध्ये विकली असून भुकटीचा साठा नसल्याचे बैठकीच्या वेळी समितीला सांगण्यात आले. त्याचप्रमाणे टेट्रापॅकमध्ये अंगणवाड्यांना दूध देण्याचा निर्णय झाला असून या संबंधी मुख्य सचिवांकडे बैठक होणार आहे असेही समितीस विदित करण्यात आले.

सन २०१५ मध्ये सभागृहातील चर्चेच्या वेळी अंगणवाडीतील बालकांना दुधाची पावडर देण्याबाबत मा.महोदयांनी आश्वासित केले होते. यासंदर्भात आश्वासनाचे वाचन करताना अंगणवाड्यांना टेट्रापॅकमध्ये दुध देण्याचा निर्णय घेण्यात आला असून याबाबत मुख्य सचिवांसोबत बैठक घेण्यात येणार आहे असे समितीस सूचित करण्यात आले होते. त्यावेळी दुधाची प्रतिलिटर किंमत २७ असून त्यावर ३ रुपये सबसिडी होती असे समितीस सांगण्यात आले. तसेच दुध भुकटीची निर्यात सबसिडी बंद केल्याने दुधाचे भाव मोठ्या प्रमाणात कमी झाले. सबब, अंगणवाडीतील बालकांना दुध उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासनाने निर्णय घ्यावा तसेच शासनाने शेतकऱ्यांना प्रतिलिटर कमीत कमी ५ रुपये सबसिडी द्यावी जेणेकरून शेतकऱ्यांना दुधाचा चांगला भाव मिळेल अशी समिती शिफारस आहे.

आश्वासन क्र. ८३५, ८३६, ८३७ व ८३८

विधानसभेच्या **सन २०१५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ८३५, ८३६, ८३७ व ८३८ बाबत दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजी "संजय गांधी निराधार योजनेच्या भत्त्यात वाढ करण्याबाबत"** या विषयावरील श्री.योगेश सागर, वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक १५२३० वरील झालेल्या चर्चेत मा.मंत्री महोदयांनी **"यासंदर्भात लवकरात लवकर जिल्हाधिकारी यांना आदेश दिले जातील. ज्याठिकाणी समित्या झाल्या नसतील अशा ठिकाणी समित्या लवकरात लवकर केल्या जातील."** असे आश्वासन दिले होते.

त्यानुसार मंगळवार, दिनांक १४ जून, २०१६ रोजीच्या बैठकीत वाचन करण्यात आले असता राज्यामध्ये संजय गांधी योजना समिती बऱ्याच जिल्ह्यामध्ये स्थापन केलेली नाही का ? अशी समितीने विचारणा केली असता, अधिकाऱ्यांनी यासंदर्भात राज्यातील सर्व तहसिलदार यांना बैठक घेण्यास सांगितले जाते असे समितीस सांगितले. समितीने काही जिल्ह्यांमध्ये समित्या स्थापन केलेल्या नसल्याचे विभागाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच हिंगोली जिल्ह्यात दोन तहसिल कार्यालये असून त्यामध्ये एकाच विचारांचे लोक असल्यास तेथील जनतेला न्याय मिळू शकेल. अद्याप फक्त दोन-तीन जिल्ह्यामध्ये समिती स्थापन झालेली आहे असे समितीने सांगितले असता अधिकाऱ्यांनी यासंदर्भात सर्व पालकमंत्री महोदयांना समित्या स्थापन करण्याच्या सूचना दिल्या आहेत असे समितीस विदित केले.

संजय गांधी निराधार योजना ही शासनाची निराधारांसाठी अत्यंत महत्वाची समिती असून यात जिल्हा व तालुका स्तरावर समित्या निर्माण केल्या जातात. परंतु समितीला साक्षीच्या वेळेस मोठ्या प्रमाणात तालुकास्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले. तसेच निराधारांना महिना रुपये ६००/- इतकी अत्यल्प रक्कम देण्यात येते तसेच सदर रक्कम वेळेवर देण्यात येत नसल्याचे समितीला आढळून आले. सबब, शासनाने निराधारांना देण्यात येणाऱ्या रक्कमेत ६००/- रुपयांवरून रु.२०००/- वाढ करावी तसेच सदर रक्कम वेळेवर मिळण्याच्या दृष्टीने तात्काळ अंमलबजावणी करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात द्यावा अशी समितीची शिफारस आहे.

आश्वासन क्र. ११७८

विधानसभेच्या **सन २०१५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ११७८ बाबत "प्रस्तावावरील चर्चा"** या विषयावरील झालेल्या चर्चेत मा.मंत्री महोदयांनी **"एखाद्या शाळेतील विद्यार्थी हे विज्ञानामध्ये मागे असतील तर त्यांना फिरत्या विज्ञान शाळेतील विज्ञानामधील पारंगत शिक्षकामार्फत शिक्षण देण्याबाबतची उपाययोजना करता येऊ शकेल का याचा विचार करण्यात येईल"** असे आश्वासन दिले होते.

त्यानुसार बुधवार, दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या बैठकीत वाचन करण्यात आले असता, विद्यार्थ्यांच्या पहिली ते पाचवीपर्यंत भाषा, गणित या विषयाची चाचणी, सहावी ते आठवीपर्यंत गणित व इंग्रजी आणि विज्ञान तसेच नववी ते दहावीपर्यंत नैदानिक चाचण्या घेतलेल्या आहेत. इयत्ता आठवीपर्यंत त्या विद्यार्थ्यांमध्ये मुलभूत क्षमता आहे की नाही त्याची माहिती नैदानिक चाचणीद्वारे घेतली जाते. प्रत्येक चाचणीचे गुण ऑनलाईन भरले जाणार आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यांची तालुकानिहाय, जिल्हानिहाय आणि केंद्रनिहाय प्रगती केली जाणार आहे. यामुळे शाळांमधील अप्रगत विद्यार्थी कोणकोणत्या

विषयामध्ये कच्चे आहेत त्याकडे लक्ष देऊन तालुकास्तरावर, केंद्र स्तरावर तसेच गणित, भाषा सोप्या पध्दतीने शिकविण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे असे विभागाच्या अधिकाऱ्यांनी समितीस विदित केले. त्यावर समितीने ही मुले गणित आणि विज्ञानामध्ये कच्ची आहेत त्यांच्यासाठी विशेष पथक तयार केले आहे का अशी विचारणा केली. त्यावर आदिवासी भागातील काही तालुके शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले असून अप्रगत मुलांचे प्रमाण जास्त आहे. आदिवासी भागातील बोलीभाषा आणि शिकविण्यात येणारी भाषा यामध्ये खुप तफावत असल्यामुळे ती मुले चौथीनंतर शाळाबाह्य होतात. त्यामुळे स्थानिक शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी बोलीभाषेत संवाद साधावा असे समितीस सांगण्यात आले. त्यावर समितीने ऊस तोडणी कामगार तसेच अनेक कामगार आपल्या उदरनिर्वाहासाठी बाहेर गावी स्थलांतरीत होतात, पावसाळ्यात १०० टक्के पटसंख्या असते. परंतु पावसाळ्यानंतर ती ५० टक्के पेक्षा खाली जाते. तसेच जिल्हापरिषदेच्या शाळेमध्ये हंगामी वसतिगृह सुरु केलेली असून त्यांना कमी अनुदान मिळत असल्यामुळे कोणतेही संस्था चालक संस्था चालविण्यास तयार होत नाही. अनुदान हंगामी वसतिगृहासाठी वाढवून दिले तर अनेक संस्था काम करतील व वसतिगृहात राहून तेथील मुले शिक्षण घेऊ शकतील. तसेच पावसाळ्यानंतर विद्यार्थ्यांची संख्या कमी होण्याचे प्रमाणही कमी होईल.

सबब, फिरत्या विज्ञान शाळेतील विद्यार्थ्यांना विज्ञानामधील पारंगत शिक्षक देण्याबाबत तसेच जिल्हापरिषदेच्या शाळेमधील हंगामी वसतिगृहांना वाढीव अनुदान तात्काळ देण्यात यावे अशी आग्रहाची शिफारस समिती करीत आहे. याची तात्काळ अंमलबजावणी करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात पाठवून देण्यात यावा.